**<u>वादी क्र. १ चा उर्वरित उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते १३ तर्फे वकील श्री. के.आर.पराडकर यांचे मार्फत शपथेवर सुरु–</u>**

**११.** हे म्हणणे खरे आहे की दाव्यासोबत जोडलेला नकाशा हा भूकरमापक यांनी तयार केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की दाव्यासोबत जोडलेला नकाशा हा मी स्वतः तयार केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर नकाशामध्ये दिशा नमूद नाहीत. हे म्हणणे खरे आहे की सदर नकाशामध्ये प्रमाण (scale) नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर नकाशामध्ये प्रमाण (scale) नमूद नसल्यामुळे आमच्या म्हणण्यानुसार प्रतिवादींनी रस्ता तयार करुन किती क्षेत्र आपल्या ताब्यात घेतले हे मला नकाशावरुन सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादींनी वादग्रस्त रस्ता तयार करुन किती क्षेत्र आपल्या ताब्यात घेतले याबाबतची निश्चित माहिती न्यायालयीन आयुक्तामार्फत अभिलेखावर आणण्यासाठी मी प्रयत्न केले नाहीत. वरील वस्तुस्थिती अभिलेखावर आणण्यासाठी मी काय प्रयत्न केले हे मला नक्की सांगता येणार नाही. (साक्षीदाराला दाव्याचा अभिलेख दाखविण्यात आला.) साक्षीदार पुन्हा सांगतो की मी न्यायालयीन आयुक्तामार्फत वरील वस्तुस्थिती अभिलेखावर आणण्याचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे नाही की रस्त्याची वस्तुस्थिती अभिलेखावर येईल या भितीने मी न्यायालयीन आयुक्ताची मागणी करणेबाबत कोणतेही प्रयत्न केले नाहीत.

(**प्रतिवादी क्र. १ ते १३ तर्फे वकील श्री. के.आर.पराडकर यांच्या तोंडी विनंतीवरुन उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**)

**श्रवणोत्तर स्विकृत,**

सही/–
(के.के.पाटील)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.

दिनांक– ०७/०३/२०२४